कार्यालय
वित्त विभाग,
जिल्हा परिषद,नागपूर

क्रमांक / जिपना / वित्त / भनिनि / 4692 / 2021 दिनांक: 04 / 08 / 2021

प्रति,

१) गट विकास अधिकारी,पंचायत समिती...............................(संबधित)

२) गट शिक्षणाधिकारी अधिकारी,पंचायत समिती.......................(संबधित)

विषय : शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतनातून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी कमी कपात करणेबाबत.

संदर्भ - १) सन २०१९-२० चा स्थानिक निधी लेखा आक्षेप क्रमांक ५/२०१९-२०

२) क्र./जिपना/वित्त/भनिनि/३१७३/ २०२१ दिनांक ३/०६/२०२१

महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भनिनि २००९/प्र.क्र. ५/आस्था ११ दिनांक २ मार्च २००९ नुसार तसेच महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम क्रं ८ वर्गणीचे दर मधील नियम (ब) अन्वये भविष्य निर्वाह निधी ची वर्गणी हि वित्तलब्धीच्या ६ टक्के प्रमाणे कपात करणे आवश्यक आहे. परंतु सोबत जोडण्यात आलेल्या लेखा आक्षेपात नमुद शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे वेतन देयकातुन सदर शासन परिपत्रक व नियमातील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम मुळ वेतनाच्या ६ टक्के पेक्षा कमी कपात केल्याने शासन निर्देशांचे तसेच नियमाचे उल्लंघन झालेले आहे. तसेच सदर नियमाचे पालन होत आहे किंवा नाही हे पाहण्याची आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची जबाबदारी असताना वेतन देयकातुन कमी दराने कपात केलेली आहे. तसेच उपरोक्त शासन परिपत्रकाचे परिच्छेद क्रं ३ नुसार सदर सुचनांचे प्रत्येक विभाग प्रमुखांनी काटेकोरपणे पालन करणेबाबत निर्देश असल्याने सदर शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम मुळ वेतनाच्या ६ टक्के अनुसार कपात सुरु केल्याबाबत व कमी कपात करण्यात आलेली रक्कम शासनखाती जमा करण्यात आल्याबाबत आवश्यक दस्ताऐवजाच्या पुर्ततेसह अनुपालन तात्काळ दिनांक १७/०८/२०२१ पर्यंत सादर करावे.

भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम मुळ वेतनाच्या ६ टक्के पेक्षा कमी कपात असल्यास कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी परतावा/ नापरतावा अग्रिम प्रस्ताव मंजुर करण्यात येणार नाही याबाबत आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांना सुचित करावे.

सहपत्र - लेखा आक्षेप क्रंमांक ५/२०१९-२०

उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर,

प्रतिलिपी,

माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

१) विभाग प्रमुख.............................................(सर्व)

२) गट विकास अधिकारी...................................... (सर्व)

३) गट शिक्षणाधिकारी अधिकारी.............................. (सर्व)

४) वा.वि.प्र.अधिकारी.......................................... (सर्व)

५) उपअभियंता (बांध/ग्रापापु/ल.सि.)........................... (सर्व)

६) मुख्याध्यापक जि.प.हायस्कुल................................ (सर्व)

७) वैद्यकीय अधिकारी,प्राथ.आरोग्य केंद्र .....................(सर्व)

उप मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

Scanned with Cam